# कार्यालय मुख्य बिजोत्पादन अधिकारी
## मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, डॉ. पं दे कृ वि., वणी रंभापूर.

जा. क्रं. / मप्राप्र /ता/ ९१० /२०२१ दिनांक: ३१/०५/२०२१

प्रती

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

**विषय:-** सन २०२१-२२ मधील पिकांचे सरंक्षण करिता भाडे तत्वावर घोडेस्वार (घोड्यासह) लावणे करिता निविदा दर मागविण्या बाबत...

**महोदय,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते कि, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर अंतर्गत एकूण सोळा (१६) विभागावर सन २०२१-२२ च्या तिन्ही हंगामात विविध पिकतील बिजोत्पादना नुसार लागवड करण्यात येणाऱ्या पिकांचे सरंक्षण करणे करिता घोडेस्वारांची (घोड्यासह) दर खालील प्रमाणे मागविण्यात येत आहे.

| अ क्रं | कामाचा तपशील | दर (रु) प्रती घोडेस्वार (घोडयासहीत) | दर (रु) प्रती घोडेस्वार फक्त (घोड्याविरहीत) | शेरा/वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | विभागनिहाय बिजोत्पादन क्षेत्राचे सरंक्षण करणे (पूर्व – पश्चिम ४ कि.मी. उत्तर – दक्षिण ४ कि.मी. अंदाजे) | १) ८ तास करिता<br>रु. -------------------<br>२) १६ तास करिता<br>रु. -------------------<br>३) २४ तास करिता<br>रु. ------------------- | १) ८ तास करिता<br>रु. -----------------<br>२) १६ तास करिता<br>रु. -----------------<br>३) २४ तास करिता<br>रु. ----------------- | १) सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत (८ तास )<br>२) दुपारी ४ ते रात्री १२ वाजेपर्यंत (८ तास)<br>३) रात्री १२ ते सकाळी ८ वाजेपर्यंत (८ तास) |

सोबत जोडलेल्या नमुना प्र-पत्रात तपशील प्रमाणे दिनांक – १५/०६/२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत सीलबंद लीफाफामध्ये संबंधीत दस्तावेजसह खालील दिलेल्या अटी व शर्तीस अनुसरून सादर करावे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेस स्वीकारल्या जातील.
२. निविदा / कोटेशन मुख्य बिजोत्पादन अधिकारी यांच्या नावाने सीलबंद लिफाफ्यात पाठवावी.
३. भाडे तत्वावर घोडेस्वार लावतांना घोड्याची व्यवस्था संबधित निविदा धारकांनी करावी
४. घोड्याचे व घोडेस्वारांचे व्यवस्थापनची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.
५. म.प्रा.प्र वणी रंभापूर कार्यालया अंतर्गत असलेल्या संपूर्ण विभागावरील प्रक्षेत्रावर लागवड केलेल्या पिकांचे घोडेस्वार सरंक्षण करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने लागू केलेल्या नुकसान निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबधी निविदा धारकाकडून वसूल करण्यात येईल.
६. घोडे व घोडेस्वार यांना नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.
७. भाडे तत्वावर घोडेस्वार लावतांना शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमाचे तंतोतत पालन संबधित निविदा धारकाना करावे लागेल.
८. विभागावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास कोर्ट कचेरीत न जाता त्याबाबतचा अंतिम निर्णय विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी /मा. संशोधन संचालक यांच्या समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक डॉ. पं.दे.कृ.वि, यांचा राहील व तो सर्वाना मान्य करणे बंधनकारक राहील.
९. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामा बाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
१०. कृषी विद्यापीठ प्रशासन वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमाचे पालन करणे निविदा धारकांना बंधनकारक राहील
११. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी देयक सादर करते वेळी बँक खाते क्रमांका बाबतची संपूर्ण माहिती देयक सादर करते वेळी देण्यात यावी अन्यथा देयकाचा विचार केला जाणार नाही.

वरील सर्व अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविधा धारकांनीच नमूद कामाचे निविदा सादर कराव्यात.

२८/५/२०२१

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र
वणी रंभापूर